# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः09.05.2024** **वारःगुरुवार**

---

1. **लोकसभा निवडणुकीच्या उर्वरित टप्प्यांसाठी सत्तारुढ आणि विरोधी पक्षांच्या मातब्बर नेत्यांच्या प्रचार सभा, आरोप- प्रत्यारोपांच्या फैरी सुरू**
2. **दिल्लीत राहणाऱ्या काश्मिरी निर्वासितांकरिता निवडणूक आयोगाकडून विशेष मतदान केंद्रांची व्यवस्था**
3. **महाराष्ट्र विधान परिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या चार जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर आणि**
4. **पाकव्याप्त काश्मीरमधलं नियोजित आंदोलनाच्या पार्श्र्वभूमीवर पाकिस्तानी प्रशासनानं लष्करी तुकड्या तैनात केल्यानं त्या भागात तणाव**

**पीएम-राजमपेट**

लोकसभा निवडणुकीच्या उर्वरित टप्प्यांसाठी सत्तारुढ आणि विरोधी पक्षांचे मातब्बर नेते प्रचार सभाघेत असून त्यांच्या आरोप- प्रत्यारोपांच्या फैरी सुरू आहेत. पंतप्रधान आणि भाजपचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी काल आंध्र प्रदेशातल्या राजमपेट लोकसभा मतदारसंघात प्रचार सभा घेतली. रायलसीमा भागात खाणींपासून भव्य मंदिरांपर्यंत, प्रज्ञावंत शेतकऱ्यांपासून बुद्धिमान तरुण, पर्यटन क्षेत्रापासून, उद्योग अशा अनेकविध क्षेत्रात प्रचंड संधी असल्याचं सांगितलं. असं असूनही केवळ वायएसआर कॉंग्रेस सरकारच्या दुर्लक्षामुळे या भागाचा विकास झाला नाही, वायएसआर कॉंग्रेसनं गरीबांचा विकास न करता फक्त  माफिया तयार केले असा आरोप मोदी यांनी केला. वायएसआर कॉंग्रेस आता लवकरच सत्तेवरून पायउतार होण्याची उलट गणना सुरू झाली असल्याचं सांगत राष्ट्रीय लोकशाही आघाडीचं सरकार रायलसीमा भागाला यशाच्या नव्या उंचीवर घेऊन जाण्याबरोबरच आंध्र प्रदेशाचाही अभूतपूर्व विकास घडवून आणेल, असंही मोदी यावेळी बोलताना म्हणाले. पंतप्रधान मोदींनी काल विजयवाडा इथं पथ फेरी काढली होती, त्याला तिथल्या नागरिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. तेलुगू देसम पक्षाचे प्रमुख चंद्राबाबू नायडू आणि जनसेना पक्षाचे प्रमुख के. पवन कल्याण हेही या पथ फेरी मध्ये सहभागी झाले होते.

**अमित शहा प्रचार**

ज्येष्ठ भाजपा नेते आणि केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी काल संध्याकाळी महाराष्ट्रात जालना इथं प्रचार सभा घेतली. देशाची सुरक्षा, समृद्धी वाढवण्यात आणि भारताचं जगातलं स्थान उंचावण्यात नरेंद्र मोदींच्या सरकारनं मोठी भूमिका बजावली असल्याचं शहा यांनी यावेळी अधोरेखित केलं. मराठवाडा मुक्ती संग्रामातील स्वातंत्र्य सैनिकांना अभिवादन करत शहा यांनी आपल्या भाषणाची सुरुवात केली. वंचित वर्गातील लोकांना घरं, स्वयंपाकाच्या गॅस जोडण्या आणि आयुष्मान भारत योजनेच्या माध्यमातून आरोग्य सेवा उपलब्ध करून देऊन मोदी सरकारनं 80 कोटी भारतीयांचं जीवनामान उंचावण्याचा प्रयत्न केला असल्याचंही त्यांनी नमूद केलं.

**शरद पवार**

केंद्रातील मोदी सरकारचं धोरण शेतकरी हिताचं नसल्याची टीका राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी काल अहमदनगर इथल्या प्रचारसभेत केली. तिथले महाविकास आघाडीचे उमेदवार नीलेश लंके यांच्या प्रचारासाठी घेतलेल्या या सभेला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे संजय राऊत, कॉंग्रेसचे बाळासाहेब थोरात आदी उपस्थित होते.

**<u>गडकरी सभा</u>**

जनतेच्या पाठिंब्यामुळे भाजपला केंद्रात प्रभावी योजनांची आणि प्रकल्पांची अंमलबजावणी करण्यास मदत झाली आहे, असं प्रतिपादन भाजपचे वरिष्ठ नेते आणि केंद्रीय मंत्री नीतीन गडकरी यांनी काल केलं. दक्षिण दिल्ली लोकसभा मतदारसंघातील पक्षाचे उमेदवार रामवीरसिंग बिधुरी यांच्या प्रचारार्थ झालेल्या सभेत ते बोलत होते. केंद्र सरकारनं गेल्या दहा वर्षात विविध प्रकल्पांसाठी जवळपास एक लाख कोटी रुपये खर्च करून दिल्लीचा कायापालट केला असल्याचं गडकरी म्हणाले.

**<u>विशेष मतदान केंद्रं</u>**

दिल्लीत राहणाऱ्या काश्मिरी स्थलांतरितांना लोकसभा निवडणुकीत त्यांचा मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी भारत निवडणूक आयोगानं राष्ट्रीय राजधानीत विविध ठिकाणी काश्मिरी निर्वासितांकरिता विशेष मतदान केंद्रांची सोय केली आहे. निवडणूक आयोगानं मतदानास पात्र असलेल्या काश्मिरी निर्वासितांना विशेष मतदान केंद्रांमध्ये जाऊन मतदान करता यावं यासाठी प्रथमच त्यांना विनामूल्य वाहतूक सुविधा उपलब्ध करून देण्याचे निर्देश दिले आहेत.

**<u>राज्य उमेदवार</u>**

सध्या सुरू असलेल्या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात एक हजार 121 उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. गेल्या वेळच्या निवडणुकीतील 867 उमेदवारांच्या तुलनेत यावेळी उमेदवारांची संख्या 29 टक्क्यांनी वाढली आहे, तथापि 13 विद्यमान खासदारांना मात्र यंदा लोकसभेत जाण्याची संधी मिळणार नाही. बीडमधून सर्वाधिक म्हणजे 41 उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. तर रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघात सर्वात कमी 9 उमेदवार निवडणूक लढवत आहेत.

**<u>परदेशी प्रतिनिधी</u>**

भारतासारख्या लोकशाही असलेल्या देशात निवडणूक प्रक्रिया ही महत्त्वपूर्ण बाब असून मतदारांचा मतदानासाठीचा उत्साह निवडणूक आयोगानं राबवलेल्या जनजागृती मोहिमेचं यश आहे, असं मत विविध देशातील प्रतिनिधींनी काल मुंबईत व्यक्त केलं. निवडणूक प्रक्रियेच्या पाहणीसाठी आलेल्या परदेशी शिष्टमंडळांच्या प्रतिनिधींनी काल राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांची भेट घेतली आणि भारतातील निवडणूक प्रक्रियेविषयी माहिती जाणून घेतली. या शिष्टमंडळानं नुकतीच रायगड इथल्या मतदान केंद्रावर जाऊन मतदान प्रक्रियेची देखील पाहणी केली. या शिष्टमंडळात बांगलादेश, श्रीलंका, कझाकिस्तान आणि झिम्बाब्वे या देशांच्या प्रतिनिधींचा समावेश आहे.

**<u>विधान परिषद-निवडणूक</u>**

केंद्रीय निवडणूक आयोगानं काल महाराष्ट्र विधान परिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाचा निवडणूक कार्यक्रम काल जाहीर केला. मुंबई पदवीधर, कोकण विभाग पदवीधर, नाशिक विभाग शिक्षक आणि मुंबई शिक्षक मतदारसंघ अशा 4 जागांसाठी ही निवडणूक होणार आहे. या मतदारसंघातले प्रतिनिधी 7 जुलै रोजी विधान परिषदेतून निवृत्त होत आहेत. त्यामुळे आयोगानं हा निवडणूक कार्यक्रम जाहीर केला आहे. 10 जूनला मतदान आणि 13 जून रोजी मतमोजणी होणार आहे.

**<u>पाकव्याप्त तणाव</u>**

पाकव्याप्त काश्मीरमध्ये येत्या 11 तारखेला होणारं आंदोलन चिरडून टाकण्यासाठी पाकिस्तानी प्रशासनानं पंजाब प्रांतातून सैनिकी तुकड्या नियुक्त केल्यानं या भागातला तणाव वाढला आहे. तथापि, शांततापूर्ण निदर्शकांवर क्रूरतेनं कोणतीही कारवाई केल्यास गंभीर परिणाम होतील असा इशारा युनायटेड काश्मीर पीपल्स नॅशनल पार्टी आणि संयुक्त अवामी कृती समितीनं प्रशासनाला दिला आहे. आपल्या न्याय्य मागण्या मांडणाऱ्या निदर्शकांच्या विरोधात प्रशासनानं बळाचा वापर केल्यास आपण आंतरराष्ट्रीय पातळीवर निषेध आणि निदर्शनं करू असं या दोन्ही संघटनांनी म्हटलं आहे. सध्या, पंजाब प्रांतातील फ्रंटियर कोअर, रेंजर्स आणि त्वरित प्र (क्यूआरएफ) चे कर्मचारी पाकव्याप्त काश्मीरमधील रस्त्यावर तैनात करण्यात आले आहेत.

**जयशंकर पीओके**

भारताचाच एक भाग असलेला पाकव्याप्त काश्मीरचा भाग देशात परत यावा यासाठी देशातील प्रत्येक राजकीय पक्ष वचनबद्ध असल्याचं प्रतिपादन परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी काल केलं. जम्मू-काश्मीरमधून कलम 370 रद्द केल्यानंतर पाकव्याप्त काश्मीरचा मुद्दा लोकांच्या विचारात आला असल्याचं त्यांनी नवी दिल्लीतील गार्गी कॉलेजमधील विद्यार्थ्यांशी संवाद साधताना म्हटलं.

**उत्तराखंड आगी**

संपूर्ण उत्तराखंडमधील जंगलातील आगीच्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी काल रुद्रप्रयाग जिल्ह्यात पिरुल लाओ-पैसे पाओ अभियानाचा प्रारंभ केला. मुख्यमंत्र्यांनी रुद्रप्रयाग जिल्ह्यात पिरुल म्हणजेच पाइन वृक्षाच्या गळून पडलेल्या पालापाचोळ्याच्या स्वच्मध्ये भाग घेतला. जंगलातील आगी रोखण्यासाठी पिरुल लाओ-पैसे पाओ मोहिमेत सहभागी होण्याचं त्यांनी यावेळी नागरिकांना आवाहन केलं. या मोहिमेअंतर्गत, जंगलातील आग रोखण्यासाठी, स्थानिक ग्रामस्थ आणि तरुणांमार्फत जंगलात पडलेला पालापाचोळा गोळा केला जाणार असून त्याचं वजन करून त्या पाचोळ्याची नियुक्त केलेल्या पिरुल संकलन केंद्रात साठवणूक केली जाणार आहे.

**सिवम निधन**

प्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक आणि छायालेखक संगीत सिवन यांचं काल मुंबईत निधन झालं. वय 65 वर्षांचे होते. त्यांना आजारपणामुळे मुंबईतील रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. त्यांनी सुमारे 20 मल्याळम आणि हिंदी भाषेतील चित्रपटांचं दिग्दर्शन केलं आहे. सिवान यांनी दिग्दर्शित केलेल्या चित्रपटांमध्ये योद्धा, व्यूहम, गंधर्वम आणि निर्णायम या मल्याळम चित्रपटांचा समावेश आहे.

**मनिका बत्रा**

भारताची अव्वल टेबल टेनिसपटू मनिका बत्रा हिने जेद्दाह इथं सुरू असलेल्या सौदी स्मॅशमध्ये जागतिक क्रमवारीत 14 व्या क्रमांकावर असलेल्या जर्मनीच्या नीना मित्तेलहॅमला पराभूत करून उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला. बात्राने मिटेलहॅमवर 11-6, 11-9, 11-7 असा विजय मिळवल्यानं ती स्पर्धेतील अंतिम आठ स्पर्धकांमध्ये सामील झाली आहे. आता उपांत्यपूर्व फेरीच्या लढतीत तिचा सामना जागतिक क्रमवारीत पाचव्या स्थानी असलेल्या जपानच्या हिना हयाता हिच्याशी होणार आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.